**OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव**
**Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511**
**Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट :-** **दिनांक -०३/०९/२०२५**

---

प्रति,

संपादक,
दैनिक---------------

विषय :- स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेला गुटखा ची अवैधरीत्या वाहतुक करणारे इसमांवर कारवाई करुन वाहनासह १,०२,३३४६०/- रु चा मुद्देमाल हस्तगत केले बाबत.

आज दि. ०३/०९/२०२५ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांना गोपनिय माहिती मिळाली की, मुक्ताईनगर मध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेला अन्नपदार्थ साठा वाहतुक होणार आहे बाबत माहिती मिळाल्याने त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा, येथील पोउपनि. सोपान गोरे यांचे नेतृत्वात पोहेकॉ/सलीम तडवी, पोकॉ/छगन तायडे, पोकॉ/रतन गिते,पोकॉ/मयुर निकम, चापोहेकॉ/भरत पाटील यांचे पथक तयार करुन त्यांना छापा कारवाई करुन कायदेशीर कारवाई करणे बाबत आदेशीत केले.

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे पोउपनि. सोपान गोरे व पथकातील पोलीस अंमलदार यांनी अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषधी प्रशासन विभा, जळगांव तसेच पंच यांचेसह मुक्ताईनगर येथे जावुन सारोळा फाटा येथे नाकाबंदी करुन सापळा रचुन मिळालेल्या गोपनिय माहितीप्रमाणे महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेला अन्न पुरवठा करणारे वाहन ताब्यात घेवुन वाहनासह एकुण १,०२,३३४६०/- रु चा महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेला अन्नपदार्थ साठा (गुटखा ) मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपी नामे १) आशिष राजकुमार जयस्वाल रा. ग्राम भमोरी, वार्ड नं. १४ देवास, मध्यप्रदेश २) आशिफ खान बुल्ला खान रा. शिवश्क्ती नगर, दत्तवाडी, नागपुर यांचे विरुध्द मुक्ताईनगर पो.स्टे. येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक सो., जळगांव, डॉ महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री अशोक नखाते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. सोपान गोरे, पोहेकॉ/सलीम तडवी, पोकॉ/छगन तायडे, पोकॉ/रतन गिते,पोकॉ/मयुर निकम, चापोहेकॉ/भरत पाटील स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी केली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
जळगांव जिल्हा पोलीस

